**प्रेस नोट** **दिनांक ०९/०३/२०१९**

## सहकारनगर पोलीस स्टेशन पुणे शहर

## गुन्हेगार नामे आदित्य दिलीप जेधे यास अटक

आगामी लोकसभा निवडणुकीचे पार्श्र्वभुमिवर मा. पोलीस उपआयुक्त परि.२, पुणे शहर यांचे आदेंशाने सहकारनगर पोलीस ठाणे हददीत पोलीस निरीक्षक गुन्हे, सपोनि कोळी, तपास पथक, सर्व्हेलन्स पथक व ऑफिस स्टाफ यांचेसह दि. ९/०३/२०१९ रोजी ००.१५ वा ते ०४.३० वा पर्यंत कोंम्बिंग ऑपरेशन करण्यात आले.

कोंम्बिंग ऑपरेशन दरम्यान बालाजीनगर, धनकवडी एलोरा पॅलेस समोर रात्रौ ०२.३० वा. चे सुमारास रेकॉर्डवरील गुन्हेगार नामे आदित्य दिलीप जेधे वय २६ वर्षे रा. स.नं. १०/११, सुखसागरनगर, कात्रज, पुणे हा हातामध्ये लोखंडी कोयता घेवुन लोकांमध्ये दहशत पसरवित असताना मिळुन आल्याने त्याने मा. पोलीस सहआयुक्त, पुणे शहर यांचे शस्त्रबंदी आदेशाचा भंग केला म्हणुन त्यास ताब्यात घेवुन त्याचेवर म.पो.ॲक्ट कलम ३७(१)(३) सह १३५, आर्म्स ॲक्ट कलम ४(२५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(अनिल शेवाळे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
सहकारनगर पोलीस स्टेशन,पुणे शहर